# ePaper “हे धंदे आता बंद करा...”, अजित पवार आणि जयंत पाटील यांच्यात रंगला कलगीतुरा



| वर्ष - 7 | अंक - 223 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- रोहित शर्मा चेन्नईकडून खेळणार?
- लोकशाही बसली धाब्यावर !
- हिट अँड रन'ची शिक्षा कमी होणार
- रुसवा-रुसवीतच निम्मा वेळ जातोय!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 21 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## पुनावळे कचरा डेपोचा मुद्दा : कलाटेंच्या ‘होमपीच’वर

# जगतापांचा ‘सर्जिकल स्ट्राईक’!

## आमदार अश्विनी जगताप, शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी मारली बाजी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील चिंचवड विधानसभा मतदार संघातील राजकीय पटलावर २००८ पासून कळीचा प्रमुख मुद्दा असलेल्या प्रस्तावित पुनावळे कचरा डेपोचे आरक्षण रद्द करून आमदार अश्विनी जगताप आणि भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी बाजी मारली. विधानसभा सभागृहात मांडलेली लक्षवेधी, महापालिका, राज्य शासनाकडे केलेला पाठपुरावा यामुळे जगताप कुटुंबियांना याचे राजकीय श्रेय मिळाले. परिणामी, माजी नगरसेवक व विधानसभा निवडणुकीतील तीव्र दावेदार राहुल कलाटे ‘बॅकफूट’ गेले आहेत.**




दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांना २०१४ मध्ये आणि २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत तगडे आव्हान उभा करणारा नेता म्हणून राहुल कलाटे यांची ओळख आहे. २०१४ मध्ये शिवसेनेच्या ‘धनुष्यबाण’ चिन्हावर आणि २०१९ मध्ये ‘बॅट’ चिन्हावर कलाटे यांनी अपक्ष निवडणूक लढवली होती. या दोन्ही निवडणुकांमध्ये कलाटे मतदार संघात स्वत:ची ‘स्पेस’ निर्माण करण्यात यशस्वी झाले होते. तत्पूर्वी, २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत ताथवडे-पुनावळे-काळाखडक-वाकड अशा प्रभागामध्ये त्यावेळी बलाढ्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीशी दोन हात करीत शिवसेनेच्या तिकीटावर तीन जागा म्हणजे रेखा दर्शिले, अश्विनी वाघमारे आणि स्वत: राहुल कलाटे निवडून आले होते. भाजपा आणि राष्ट्रवादीची मोठी ताकद असतानाही या भागातील नागरिकांनी कलाटे यांच्या पॅनेलला पसंती दिली होती. त्यामुळे राहुल कलाटे पुनावळे कचरा डेपोबाबत सर्वात आक्रमकपणे भूमिका मांडतील, असे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही.

दरम्यान, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर फेब्रुवारी २०२२ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या उमेदवार अश्विनी जगताप, महाविकास आघाडीचे नाना काटे आणि अपक्ष राहुल कलाटे रिंगणात होते. कलाटे यांनी निर्णायक मते खेचली होती. त्यानंतर संधी असतानाही कलाटे पुनावळे कचरा डेपोच्या मुद्यावर आग्रही झालेले पहायला मिळाले नाही. विशेष म्हणजे, पुनावळेतील सोसायटीधारक, स्थानिक ग्रामस्थ यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलनांमध्ये राहुल कलाटे किंवा राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक मयूर कलाटे अपवाद वगळता कुठेही पहायला मिळाले नाहीत.

याउलट, आमदार अश्विनी जगताप यांनी कलाटे यांचे ‘होमपिच’ असलेल्या ताथवडे-पुनावळे-काळाखडक आणि वाकड प्रभागातील पुनावळे कचरा डेपोचा प्रश्न निकालात काढला. त्यामुळे सोसायटीधारकांसह ग्रामस्थांच्या ‘गुडबॉक्स’मध्ये जगताप कुटुंबियांनी स्थान मिळवले आहे. याचा फटका कलाटे यांना आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत बसेल. कारण, पुनावळे आणि परिसरातील सुमारे २० हजार मतदार यामुळे प्रभावीत झाले आहेत, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.




### मुख्यमंत्र्यांची भेट घेतली पण...



» दुसरीकडे, “पुनावळेत झालेल्या प्रचंड शहरीकरण आणि नागरीकरणाच्या धर्तीवर हा कचरा डेपो किती घातक आणि हानिकारक आहे याबाबत चर्चा करण्यासाठी गेल्या पंधरा दिवसांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतल्याचे कलाटे यांनी ‘सोशल मीडिया’द्वारे म्हटले आहे. त्याचवेळी डेपो रद्द होणार असा दावा कलाटे यांनी केला असता, तर कदाचित त्यांना श्रेय मिळाले असते. पण, उदय सामंत यांनी आमदार अश्विनी जगताप यांच्या लक्षवेधीला उत्तर दिले. त्यामुळे हा विषय राजकीयदृष्ट्या जगताप यांनी ‘क्रेडिट’ केला. सातत्याने या विषयावर पाठपुरावा केला. कलाटे यांना संधी असतानाही त्यांना हा विषय यशस्वीपणे हाताळता आला नाही. परिणामी, कलाटेंच्या ‘होमपीच’ वर जगतांचा ‘सर्जिकल स्ट्राईक’ अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



### नाना काटे यांचीही संधी हुकली..!



»राज्यात महायुतीची सत्ता आहे. २००८ साली पुनावळेत कचरा डेपोचे आरक्षण निश्चित करण्यात आले. त्यावेळी महापालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निर्विवाद वर्चस्व होते. राज्यात आघाडी सरकार होते. २०१७ पर्यंत महापालिकेत सत्ता होती. २०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता आली. त्या अडीच वर्षांतही नाना काटे यांना पुनावळे कचरा डेपो रद्द करुन राजकीय भवितव्याच्या दृष्टीने हा विषय ‘क्रेडिट’ करता आला असता. मात्र, नाना काटे केवळ पत्रक, निवेदन आणि मागणी इथपर्यंतच मर्यादित राहीले. चिंचवड पोटनिवडणुकीत पुनावळे भागात सर्वाधिक मते नाना काटे यांना मिळाली आहेत. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आहेत. महायुती सरकारमध्ये सत्तेत सहभागी असतानाही पुनावळे कचरा डेपोचे श्रेय भाजपाला मिळाले. नाना काटे यांची संधी हुकली, ही वस्तुस्थिती आहे.

### तुषार कामठे यांचा चिंचवडच्या रिंगणात चंचूप्रवेश...



»पुनावळे कचरा डेपोच्या मुद्यावर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या रिंगणात चंचूप्रवेश केला आहे. कचरा डेपोविरोधात सोसयटीधारक आणि स्थानिक नागरिकांनी बाईक रॅली काढली होती. या रॅलीमध्ये सुमारे ७ हजार दुचाकीस्वार सहभागी झाले होते. त्यावेळी तुषार कामठे यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. लोकभावना लक्षात घेत कामठे यांनी थेट महापालिका प्रवेशद्वारावर साखळी उपोषण सुरू केले. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या माध्यमातून कामठे यांनी हिवाळी अधिवेशनात पुनावळे कचरा डेपोच्या विषयाकडे लक्ष वेधले. आगामी २०२४ च्या निवडणुकीत या मतदार संघातून भाजपा विरोधातील ‘स्पेस’ भरुन काढण्याची संधी यानिमित्ताने तुषार कामठे यांना मिळेल, असेही निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.

# शेतकरी प्रश्नांवरून अमोल कोल्हे आक्रमक

## आक्रोश मोर्चाचे आयोजन; शरद पवारही राहणार उपस्थित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील सर्व घटकांतील नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. त्या नागरिकांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठविल्यावर खासदारांचे निलंबन केले जाते, यासह अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि केंद्र, राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ डिसेंबरला शिवनेरीपासून भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाला सुरुवात होणार आहे, तर ३० डिसेंबर रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे.**



ग्रामीण आणि शहरी भागातून हा मोर्चा मार्गस्थ होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मोर्चाची सांगता सभा होणार आहे. तसेच या सभेला महाविकास आघाडीमधील अनेक नेते मंडळीदेखील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयामध्ये भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत अमोल कोल्हे यांनी अनेक विषयांवर भाष्यदेखील केले. यावेळी खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, मी आणि सुप्रिया सुळे यांनी कांदा निर्यात बंदीच्या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी केली. त्या मागणीनंतर आम्हा दोघांना अध्यक्षांनी निलंबित केले. ही कारवाई आमच्यावरच थांबली नाही, तर तब्बल १४१ खासदारांना अध्यक्षांनी निलंबित केले आहे. त्या कारवाईमधून अध्यक्ष हे निलंबित करण्याच्या मूडमध्ये होते की काय? पण, या निलंबनाच्या कारवाईमधून केंद्र सरकारचा बुरखा फाटला असल्याचे सांगत केंद्र सरकारवर त्यांनी टीका केली.

तसेच ते पुढे म्हणाले की, माझ्यासह देशातील जनतेने २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संसदेतील पायऱ्यांवर नतमस्तक होताना पाहिले आहे. पण, आज संसदेतील सहकार्यांना पंतप्रधान नरेंद्र मोदींना संसदेत येऊन निवेदन करावे, हे सांगावे लागत आहे. त्यामुळे नेमका खरा चेहरा कोणता, असा सवाल उपस्थित करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर त्यांनी निशाणा साधला. तसेच ते पुढे म्हणाले की, त्यामुळे एकूणच देशातील आणि राज्यातील परिस्थिती लक्षात घेऊन, केंद्र आणि राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ ते ३० डिसेंबरदरम्यान शिवनेरी ते पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. अयोध्येत राम मंदिराचे उदघाटन होत आहे. त्या कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले का, या प्रश्नावर अमोल कोल्हे म्हणाले की, राम मंदिराचे उदघाटन होत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे, पण मला तरी निमंत्रण नाही.

मात्र, माझी एक अपेक्षा आहे की, राम मंदिराचे उदघाटन थाटामाटात करा, पण या देशात रामराज्य आणण्याचीदेखील तेवढीच मोठी जबाबदारी आहे, याचीदेखील जाणीव ठेवा आणि रामराज्य आले पाहिजे, अशी भूमिका कोल्हे यांनी मांडत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर अप्रत्यक्षपणे निशाणा साधला. देशातील सर्व घटकांतील नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. त्या नागरिकांच्या प्रश्नावर संसदेत आवाज उठविल्यावर खासदारांचे निलंबन केले जाते, यासह अनेक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि केंद्र, राज्य सरकारला जाग आणण्यासाठी २७ डिसेंबरला शिवनेरीपासून भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाला सुरुवात होणार आहे, तर ३० डिसेंबर रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा धडकणार आहे.

### कांदा निर्यात बंदीच्या प्रश्नावर चर्चा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मोर्चाची सांगता सभा होणार आहे. तसेच या सभेला महाविकास आघाडीमधील अनेक नेते मंडळीदेखील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत दिली. शिरुर लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमोल कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयामध्ये भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत अमोल कोल्हे यांनी अनेक विषयांवर भाष्यदेखील केले. यावेळी खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, मी आणि सुप्रिया सुळे यांनी कांदा निर्यात बंदीच्या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी केली.

# शैक्षणिक अभ्यासक्रमातून निवडणूक प्रक्रियेचे धडे

## निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.**



युजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यार्थ्यांना लोकशाही, मतदान आदी प्रक्रिया समजावून सांगण्यासाठी अभ्यासक्रमाची निर्मिती करणे, त्यासाठीचे श्रेयांक निश्चित करणे, वयाची १७ वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा मतदार नोंदणीसाठी संस्थास्तरावरील आराखडा तयार करून एआयएसएसई आणि युडायइस संकेतस्थळाला जोडणे, संबंधित विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करणे, अध्यापनासाठी शिक्षक-प्राध्यापकांना ऑनलाईन किंवा ऑफलाइन पद्धतीने प्रशिक्षित करणे, विद्यार्थ्यांमध्ये मतदान आणि त्याबाबतचे प्रक्रियेबाबत जागरूक करण्यासाठी अभियान राबवण्यासंदर्भातील सूचना परिपत्रकाद्वारे देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेमध्ये, विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, भारतीय निवडणूक आयोगाचे मोबाइल उपयोजन, बॅलेट युनिट, मतदान विभाग, नियंत्रण विभाग, पीठासीन अधिकारी, दोन मतदान अधिकारी, पोलिंग एजंट, मतदान कप्पे आदींबाबतची माहिती दिली जाईल. निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देऊन जागरूक करण्याचा उद्देश आहे. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजावण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाणार आहे. तसेच येत्या २५ जानेवारी रोजी शैक्षणिक संस्थांमध्ये 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. देशातील निवडणूक प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच जागरूक करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.निवडणूक प्रक्रियेची संपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देऊन जागरूक करण्याचा उद्देश आहे. प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया समजावण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये अभिरूप निवडणूक (मॉक पोल) घेतली जाणार आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि भारत निवडणूक आयोग यांच्यात करार करण्यात आला असून, त्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यापीठ, महाविद्यालय स्तरावर मतदार शिक्षण आणि निवडणूक साक्षरता या विषयी अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) दिले आहेत.

# उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती!

## आ. महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश : नगर विकास विभागाचे महापालिकेला आदेश

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडून शहरातील मिळकतधारकांकडून व्याजासह वसुल करण्यात येणाऱ्या उपयोगकर्ता शुल्क वसुलीला राज्य शासनाने स्थगिती दिली आहे. त्यामुळे सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा मिळाला आहे. आमदार महेश लांडगे यांनी या प्रश्नावर यशस्वी पाठपुरावा केला.**





मुंबई येथील पावसाळी अधिवेशनात आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडमधील उपयोगकर्ता शुल्क वसुली रद्द करावी, अशी मागणी लक्षवेधीद्वारे केली होती. त्यावर पाठपुरावा सुरू होता. सोसायटी फेडरेशन व आमदार लांडगे यांचा या शुल्कवसुलीला विरोध होता. त्यावेळी या प्रश्नावर बैठक घेण्यात येईल आणि निर्णय होईल, असे आश्वासन राज्य सरकारने दिले होते.

शहरातील घरटी दरमहा ६० रुपये उपयोगकर्ता शुल्क व गेल्या ४ वर्षांचे व्याज असे वसुलीस विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक व विविध संघटनांनी विरोध केला होता. दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२४ या ४ वर्षांचा उपयोगकर्ता शुल्क व्याजासह मिळकतधारकांच्या मिळकत करामध्ये समाविष्ट करण्यात येत होते. प्रशासन आणि अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाचा भुर्दंड सर्वसामान्य मिळकतधारकांना बसत होता.

दरम्यान, नागपूर हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आमदार लांडगे पुन्हा लक्षवेधी सूचना केली होती. त्यावर "मुख्यमंत्री महोदय यांच्या बैठक घेण्यात येईल. तोपर्यंत महापालिका प्रशासनाने आकारणी करण्यात येणाऱ्या उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती देण्यात येत आहे." अशा आशयाचे पत्र राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने महापालिका आयुक्तांना पाठवले आहे.

त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील सुमारे ६ लाख मिळकतधारकांना या निर्णयाचा फायदा होणार असून, पिंपरी-चिंचवडकरांचे प्रतिवर्षी अंदाजे ३२ कोटी रुपये वाचणार आहेत.

> २०१९ मध्ये लागू केलेला उपयोगकर्ता शुल्क महापालिका प्रशासन २०२३ मध्ये वसुल करीत होते. त्यावर व्याजही घेतले जात होते. प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा फटका सर्वसामान्य मिळकतधारकांना बसत होता. शास्तीकर रद्द केला आणि उपयोगकर्ता शुल्क लादले, असे आक्षेपही नोंदवण्यात आले. पण, आम्ही पावसाळी अधिवेशनात आणि त्यानंतरही वेळोवेळी पाठपुरावा सुरू ठेवला. नागपूर हिवाळी अधिवेशनातही लक्षवेधी लावली होती. मात्र, पिंपरी-चिंचवडकरांना दिलासा देणारा आदेश राज्य शासनाने दिला. उपयोगकर्ता शुल्क वसुलीला स्थगिती दिली. मुख्यमंत्र्याच्या नियोजित बैठकीतही सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# आर्थिक उन्नतीमधूनच महिलांचे सक्षमीकरण!

## प्रा. कविता आल्हाट : महिला आर्थिक सक्षमीकरण मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विविध सणांच्या माध्यमातून महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठा उपलब्ध करून दिल्यास त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असे प्रतिपादन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. आर्थिक उन्नतीमधूनच महिलांचे सक्षमीकरण शक्य आहे असे देखील प्रा.आल्हाट पुढे म्हणाल्या.**



लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशन व पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने महिला आर्थिक सक्षमीकरण मेळावा जय गणेश लॉन्स मोशी या ठिकाणी झाला. यानिमित्ताने प्रा.आल्हाट बोलत होत्या.

कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, पीडीसीसी बँकेचे लक्ष्मण मातळे ,माजी नगरसेवक वसंत बोराटे, मंदा आल्हाट, सारिका बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते गुलाब बनकर, प्रदेश स्वयंरोजगार सेल अध्यक्ष मेघा पवार, चिखली विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन प्रदीप आहेर, युवा नेते विशाल आहेर, संगीता आहेर, अर्चना सस्ते आदी उपस्थित होते.

प्रा. आल्हाट पुढे म्हणाल्या, अशा प्रकारचा महिलांसाठी आर्थिक सक्षमीकरण मेळावा घेण्याचे मुख्य कारण हेच आहे की, महिलांना स्वयंरोजगार मिळायला हवा. स्वयंरोजगारातून त्यांना आर्थिक पाठबळ मिळाले तरच त्यातून त्यांची प्रगती निश्चित होणार आहे.

याही पुढे जाऊन विविध सणांच्या माध्यमातून महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होतील.

यावेळी पीडीसीसी बँकेच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सक्षम बनवण्यासाठी योजनांची माहिती व कर्जमाफी सवलती यांचे मार्गदर्शन बँकेचे संचालक प्रवीण शिंदे यांनी केले.

तसेच बँकेचे सुजीत शेख यांनी महिलांना डिजिटल साक्षरता विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांना हर्बल उत्पादनांचे प्रशिक्षण देण्यात आले. महिला घरातूनच आपला स्वतःचा व्यवसाय कसा चालू करू शकतात याची देखील माहिती त्यांना देण्यात आली.

> बचतगटांच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तुंना बाजारपेठेत मागणी आहे. महिला बनवित असलेल्या उत्पादने, नवनवीन वस्तू व उपक्रमाला शासनातर्फेदेखील प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होत असतो. या उत्पादनांच्या विक्रीसाठी तालुका, जिल्हा पातळीवर जागा उपलब्ध करून दिली जाते. याची माहिती महिलांना व्हावी हाच प्रयत्न या मेळाव्याच्या आयोजनाचा आहे. शासनाच्या योजना, सवलती, बँकांकडून होणारा कर्ज पुरवठा अशी सर्व माहिती महिलांनी घ्यावी आणि संधीचे सोने करावे.
>
> **-अजित गव्हाणे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी अजित पवार गट**




**संसदेच्या एकाच अधिवेशनात दोन्ही सभागृहांच्या मिळून तब्बल १४१ सदस्यांचे निलंबन झाले, हे इतक्या मोठ्या संख्येने कधीही झालेले नसले तरी संसदेतील गोंधळ नवीन नाही. आपल्या या राष्ट्रीय कायदेमंडळात राजकीय पक्ष/आघाडीची भूमिका काहीही असो, गेल्या अनेक वर्षांपासून हेच चित्र दिसते आहे : विरोधक एखाद्या महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चेची मागणी करतात आणि सरकार टाळाटाळ करते.**

# खासदार कारवाईमागचा दृष्टिकोन जुनाट



आपल्या संसदीय व्यवस्थेतील अनेक वर्षांच्या प्रक्रियात्मक स्तब्धतेमुळे आजही आपण हे प्रकार पाहात आहोत. विरोधकांनी व्यत्यय आणायचा आणि सत्ताधारी पक्षाने अनुशासनात्मक प्रतिसाद द्यायचा, असेच गेली काही दशके चालू आहे. नेमके सांगायचे तर, खासदारांनी संसदीय कामकाजात नियमित व्यत्यय आणणे १९६० च्या दशकात सुरू झाले. अर्थात, तेव्हा असे खासदार एकटेदुकटेच असत. पीठासीन अधिकारी त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी पुरेशी संधी देत नाहीत, असे वाटल्यामुळे ते व्यत्यय आणण्याचा मार्ग निवडत. तिसऱ्या लोकसभेचे (१९६२-६७) सदस्य राम सेवक यादव आणि मणिराम बागरी यांसारख्या खासदारांना सभापतींनी संसदेच्या नियमांचे पालन करण्याची तंबी वारंवार दिली होती.अखेर यादव आणि बागरी यांचे सदस्यत्व (निरनिराळ्या प्रसंगी, निरनिराळ्या वेळी) वारंवार व्यत्यय आणल्याच्या कारणासाठी सभागृहाने सात दिवस स्थगित केले. हे सात दिवसांसाठीचे निलंबनच होते. ते कदाचित, लोकसभेतून निलंबित झालेले पहिले खासदार ठरतील. याच तिसऱ्या लोकसभेने आपल्या कार्यकाळाच्या अखेरीस आठ खासदारांना निलंबित केले होते अशीही नोंद सापडते. याचा अन्वयार्थ असा की संसदीय संवादात आणि विचारविनिमयात व्यत्यय आणणे हा एक 'मार्ग' आहे, असे विरोधी पक्षीयांना वाटू लागले होते. तेव्हापासून आजतागायत, खासदारांनी संसदेच्या सभागृहांत कामकाज रोखण्याचा प्रयत्न केल्याचे आणि त्यासाठी शिस्तभंगाची कारवाई झाल्याचे प्रसंग अनेकदा घडले आहेत. पण कालांतराने, संसदीय कामकाजात व्यत्यय आणण्याचा प्रकार हा हळूहळू 'राजकीय साधन' ठरू लागला- किंबहुना एवढेच एक साधन आपल्या हातात आहे, असे गृहीत धरून विरोधी बाकांवरील सदस्य वागू लागले. संसदेच्या अनेक पीठासीन अधिकाऱ्यांनी या बदलत्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे. चौदाव्या लोकसभेचे अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांची टिपणी अशी : "अनेक प्रसंगी, सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय येतो. हा प्रकार उत्स्फूर्तपणे होत नाही, तर आरडाओरडा करून आणि सभागृहाच्या विहिरीत घुसून कामकाज थांबवण्याच्या हेतुपुरस्सर कृत्यांमागे, केवळ संसदेची सभागृहे चालू न देण्याचा हेतू दिसतो." अशा प्रकारे गोंधळ घालून व्यत्यय आणण्याचे स्वरूप विकसित होत असताना, संसदेचा संस्थात्मक प्रतिसाद मात्र साधा आणि जुनाट वळणाचाच राहिला, हेही आपण पाहिले पाहिजे. अगदी आजही, संसदेतली पीठासीन मंडळी अशा प्रकारच्या व्यत्ययांना निव्वळ 'शिस्तभंगा'ची समस्या मानतात. एकदा का 'शिस्त मोडण्या'ची कल्पनाच मान्य केली की मग 'शिस्त लावण्यासाठी विशेष प्रयत्न' म्हणून दंडशक्तीचा वापर करणे हे जणू पुढले अपरिहार्य पाऊल मानले जाते! हेच तर आजदेखील आपल्या संसदेत सुरू आहे (आणि यापूर्वीही असे प्रकार घडले होते). असे का व्हावे? भारतीय राज्यघटनेच्या रचनाकारांनी या राष्ट्रीय कायदेमंडळाची रचना एक संस्था म्हणून केली (राज्यघटनेतील प्रकरण दुसरे, अनुच्छेद ७९ ते १२२ हे संसदेशी संबंधित आहेत), हे आपणा सर्वांना माहीत असेल. पण सरकारला – पर्यायाने सत्ताधारी पक्षाला त्याचा व्यवहार सुकरपणे करता यावा एवढाच या रचनेचा हेतू होता काय, हा प्रश्न उपस्थित होतो. संसदीय कार्यपद्धतीच्या नियमावलीमुळे या विचारप्रक्रियेला बळ मिळाले (ही नियमावली हा काही राज्यघटनेचा भाग नाही, परंतु ती घटनात्मकदृष्ट्या वैध आहे). ती नियमावली मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातल्या ब्रिटिश साच्यावर आधारित होती आणि आहे. आपले संसदीय प्रारूप हे 'वेस्टमिन्स्टर प्रारूप' आहे, हे पुन्हा सांगायला नको, पण त्या वेळी वसाहतवादी सरकारच्या कारभाराला विधिमंडळात प्राधान्य मिळावे असाच त्या नियमावलीचा उद्देश होता.

## संपादकीय »

# संसद सत्ता की

***संसदेचे सध्याचे अधिवेशन सुवर्णाक्षरांत नोंद करून ठेवावे असे असणार याबाबत कोणाच्याही मनात तिळमात्र शंका असणार नाही.***

संसदेचे सध्याचे अधिवेशन सुवर्णाक्षरांत नोंद करून ठेवावे असे असणार याबाबत कोणाच्याही मनात तिळमात्र शंका असणार नाही. ल्युटन्सच्या नाकावर टिच्चून उभी राहिलेली ही नवी कोरी भव्य वास्तू! गेल्या अधिवेशनात उद्घाटनाच्या निमित्त विविध अभिनेत्रींच्या पुण्यस्पर्शाने पुनीत झालेली! त्या वेळी देशाचे माहिती खात्याचे मंत्री जातीने आपल्या सुस्वरूप अभिनेत्रींना लोकशाहीच्या मंदिराचा कोपरा न कोपरा दाखवत होते, हे दृश्य कोण विसरेल? अशा या नव्या कोऱ्या मंदिरातील हे पहिलेच पूर्ण अधिवेशन. तेही आणखी एका मंदिराच्या जानेवारीत होऊ घातलेल्या उद्घाटनाआधीचे. त्यामुळे या अधिवेशनास तसेही महत्त्व होतेच. त्यात लोकसभेची सुरक्षा यंत्रणा भंग करून तरुणांनी त्याकडे लक्ष वेधले. त्यामुळे या सभागृहातील कामकाजाकडे समस्त भरतवर्षांचे लक्ष लागलेले. ते अधिक लागावे.

**लोकसभेच्या घोषित कार्यसूचीनुसार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे १९ डिसेंबर रोजी 'भारतीय न्याय (द्वितीय) संहिता' (भारतीय दंड संहिता-१८६० च्या ऐवजी), 'भारतीय नागरिक सुरक्षा (द्वितीय) संहिता' आणि 'भारतीय साक्ष्य (द्वितीय) विधेयक' (भारतीय पुरावा कायदा- १८७२ च्या ऐवजी) अशी तीन विधेयके मांडतील.**

# फौजदारी कायदे बदलाल, पोलिसी दंडेलीचे काय?



थोडक्यात, या तीन विधेयकांची दुसरी आवृत्ती संसदेत मांडली जाईल आणि त्यावर – आता अनेक विरोधी पक्षीय खासदारांना निलंबितच केल्यामुळे- लगेच आवाजी मतदान होईल. या दुसऱ्या आवृत्त्या संसदीय स्थायी समितीचा अहवाल विचारात घेऊन मग, सुधारित स्वरूपात सादर करण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे. परंतु या विधेयकांचे तपशील पाहिल्यास काय दिसते? ही विधेयके का आवश्यक आहेत यावरील भाषणे तर याआधीही झाली आहेत (वसाहतवादी कायदे नाकारून आम्ही भारतीयांसाठी भारतीय कायदे आणत आहोत वगैरे) आणि ती बदलणार नाहीत. पण विधेयके संसदीय समितीच्या सूचनांनंतर आणि मध्यंतरीच्या काळात कायदा क्षेत्रातूनही बराच साधकबाधक ऊहापोह झाल्यानंतर तरी खरोखरच बदलली का, हे तपासून पाहायला हवे. तसे पाहिल्यास, या नव्या विधेयकांतून फौजदारी कायदा आणि न्यायासाठी कोणतीही नवी, बदलाची दृष्टी सापडणे कठीण आहे. उलट हे कायदे राज्य नियंत्रणाचा अवास्तव विस्तार करणाऱ्या व्यवस्थेकडे वाटचाल करणारे आहेत, कारण त्यांत गुन्हेगारीकरण आणि पोलिस अधिकार या दोहोंची व्याप्ती वाढवण्यात आलेली आहे. उदाहरणार्थ 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता'च्या एका विशिष्ट पैलूचा नागरी स्वातंत्र्यावर लक्षणीय परिणाम होईल परंतु त्याकडे फारसे लक्ष दिले गेलेले नाही. फौजदारी कायद्याऐवजी येणाऱ्या या संहितेत, पोलिस कोठडीच्या संभाव्य कालावधीचा प्रचंड विस्तार करण्यात आलेला आहे. वास्तविक आज नागरी स्वातंत्र्याच्या संरक्षणाच्या अगदी केंद्रस्थानी आहे ती 'पोलीस कोठडीची कमाल मर्यादा १५ दिवस' ही तरतूद. पण नव्या फौजदारी कायद्यात (नागरिक सुरक्षा संहिता) ही पोलिस कोठडीची कमाल मर्यादा १५ दिवसांवरून ६० दिवस किंवा ९० दिवसांपर्यंत (गुन्ह्याच्या स्वरूपावर अवलंबून) वाढवली जाईल. या वाढीमुळे पोलिसी छळाचा धोका वाढतो. दीर्घकाळ अटकेनंतर जबरदस्ती आणि बनावट पुराव्याचा वाढलेला धोका हेही पोलीस कोठडीशी जोडले गेलेले आजवरचे अनुभव आहेत, त्या शक्यता आता वाढतीलच. पोलीस अधिकारांचा हा धक्कादायक विस्तार आहे. उल्लेखनीय म्हणजे, आजवर सामान्य फौजदारी कायदा 'विशेष कायदे' यांत फरक होता. आता तर 'विशेष कायद्यां'पेक्षा जास्त कालावधीसाठी पोलीस कोठडीची तरतूद नव्या विधेयकात आहे. पोलिस कोठडीचा हा विस्तार 'भारतीय न्याय संहिते'मध्ये मोघमपणे प्रस्तावित केलेल्या अतिव्याप्त गुन्ह्यांच्या संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# रुसवा-रुसवीतच निम्मा वेळ जातोय!

## जितेंद्र आव्हाडांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना टोला!

| मुंबई | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाचं सूप वाजलं असून आता अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत येत्या २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. हिवाळी अधिवेशनात विविध मुद्द्यांवरून सत्ताधारी व विरोधक आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं. आज शेवटच्या दिवशीही आरोप-प्रत्यारोप व दावे-प्रतिदाव्यांमुळे नागपूर विधिमंडळ परिसरातील वातावरण तापल्यातं दिसून आलं. या पार्श्वभूमीवर अधिवेशनाचं सूप वाजल्यानंतर विरोधी पक्षांच्या पत्रकार परिषदेत शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सरकारला परखड सवाल केला.**



अधिवेशनाचं फलित काय असं कुणी मला विचारलं तर मी सांगेन शून्य. सरकारकडून विदर्भवासीयांना काहीच देण्याचा प्रयत्न झाला नाही. एक अधिवेशन नागपूरला घेण्यामागची भूमिका ही होती की या अधिवेशनातून विदर्भवासीयांचा विचार होईल आणि विदर्भाला मदत केली जाईल. पण असं काहीही या अधिवेशनात घडलं नाही", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना जितेंद्र आव्हाडांनी ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांचा मुद्दा उपस्थित केला. "या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देवेंद्र फडणवीसांनी १७ हजार कोटींची तूट दाखवली. पण गेल्या अधिवेशनात ४४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. या अधिवेशनात ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. आता ते सगळे मिळून १ लाख १६ हजार कोटी सरकार आणणार कुठून? घोषणा करून फक्त कागदावर सांगण्यात अर्थ नाही. लोकांच्या हातात काय जातं? हे महाराष्ट्राला नेमकं माहिती आहे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. "एका शेतकऱ्यानं पत्र पाठवलं होतं की पीकविम्याचे फक्त ५२ रुपये मिळाले असून ते परत करण्यासाठी अधिवेशनात येण्याची परवानगी मिळावी. हे मुंबईत ४०० किलोमीटरचे रस्ते बनवू असं म्हणतात. काय गंमत वाटते का? मुंबईतल्या रस्त्यांचे टेंडर सगळे महाराष्ट्राच्या बाहेरच्या लोकांना देण्यात आले. मुंबईच्या कंत्राटदारांवर दबाव टाकण्यात आला की तुम्ही निविदा भरायची नाही. समृद्धी महामार्गावरील अपघातांवर कुणीच बोलत नाही. स्वत:चे आमदार फुटू नयेत, यासाठी त्यांना अर्थसंकल्पातून खोके देण्यात आले", अशा शब्दांत आव्हाडांनी सरकारवर टीकास्र सोडलं. दरम्यान, यावेळी जितेंद्र आव्हाडांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना टोला लगावला. "यांच्याकडे कधी हा रुसतो, कधी तो रुसतो. रुसवा-रुसवीतच सरकारचा निम्मा वेळ जातोय. बिचाऱ्या मुख्यमंत्र्यांना कधी इकडे धावावं लागतं, कधी तिकडे धावावं लागतं. त्यात महाराष्ट्राचं नुकसान होतंय. त्यामुळे हे तीन टाळ्यांचं सरकार महाराष्ट्राच्या अधोगतीचं कारण आहे", असं आव्हाड म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना जितेंद्र आव्हाडांनी ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांचा मुद्दा उपस्थित केला. "या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देवेंद्र फडणवीसांनी १७ हजार कोटींची तूट दाखवली. पण गेल्या अधिवेशनात ४४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. या अधिवेशनात ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. आता ते सगळे मिळून १ लाख १६ हजार कोटी सरकार आणणार कुठून? घोषणा करून फक्त कागदावर सांगण्यात अर्थ नाही. लोकांच्या हातात काय जातं?

### 17 हजार कोटींची तूट दाखवली

अधिवेशनाचं फलित काय असं कुणी मला विचारलं तर मी सांगेन शून्य. सरकारकडून विदर्भवासीयांना काहीच देण्याचा प्रयत्न झाला नाही. एक अधिवेशन नागपूरला घेण्यामागची भूमिका ही होती की या अधिवेशनातून विदर्भवासीयांचा विचार होईल आणि विदर्भाला मदत केली जाईल. पण असं काहीही या अधिवेशनात घडलं नाही", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. दरम्यान, यावेळी बोलताना जितेंद्र आव्हाडांनी ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्यांचा मुद्दा उपस्थित केला. "या सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात देवेंद्र फडणवीसांनी १७ हजार कोटींची तूट दाखवली. पण गेल्या अधिवेशनात ४४ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. या अधिवेशनात ५५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या आल्या. आता ते सगळे मिळून १ लाख १६ हजार कोटी सरकार आणणार कुठून? घोषणा करून फक्त कागदावर सांगण्यात अर्थ नाही. लोकांच्या हातात काय जातं? हे महाराष्ट्राला नेमकं माहिती आहे", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले. "एका शेतकऱ्यानं पत्र पाठवलं होतं की पीकविम्याचे फक्त ५२ रुपये मिळाले असून ते परत करण्यासाठी अधिवेशनात येण्याची परवानगी मिळावी. हे मुंबईत ४०० किलोमीटरचे रस्ते बनवू असं म्हणतात. काय गंमत वाटते का? मुंबईतल्या रस्त्यांचे टेंडर सगळे महाराष्ट्राच्या बाहेरच्या लोकांना देण्यात आले. मुंबईच्या कंत्राटदारांवर दबाव टाकण्यात आला की तुम्ही निविदा भरायची नाही. स्वत:चे आमदार फुटू नयेत, यासाठी त्यांना अर्थसंकल्पातून खोके देण्यात आले", अशा शब्दांत आव्हाडांनी सरकारवर टीकास्र सोडलं.

# मनोज जरांगेंच्या अल्टीमेटमवर शिंदेंची जाहीर विनंती!

## मराठा आरक्षणासाठी विशेष अधिवेशन बोलवता येणार नाही

| मुंबई |

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षणाचा वाद सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. परंतु तेथे अपयश आले तर आरक्षणासाठी पुन्हा एकदा कायदा केला जाईल. त्यासाठी फेब्रुवारीत विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (१९ डिसेंबर) विधानसभेत केली. मुख्यमंत्री शिंदे यांच्या घोषणेनंतर विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. कारण या काळात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे.**

त्यामुळे अशा स्थितीत विशेष अधिवेशन बोलवता येईल का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी उत्तर दिलं आहे. मराठा आरक्षण हा आता राजकीय मुद्दा झाला आहे. त्यामुळे आचारसंहितेच्या काळात विशेष अधिवेशन बोलावता येणार नाही, हे कायद्यानुसार स्पष्ट आहे, अशी प्रतिक्रिया सरोदे यांनी दिली. ते 'टीव्ही ९ मराठी'शी बोलत होते. फेब्रुवारीमध्ये मराठा आरक्षणासंदर्भात विशेष अधिवेशन बोलावता येईल का? असा प्रश्न विचारला असता कायदेतज्ज्ञ असीम सरोदे म्हणाले, "निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर जीवनावश्यक



विषयासंदर्भातच अधिवेशन घेता येते. पण मराठा आरक्षण हा राजकारणाचा अविभाज्य भाग झाला आहे. राजकारण स्थिरावणं किंवा राजकारण बदलणं ही प्रक्रिया मराठा आरक्षणाच्या एका प्रश्नावरून होऊ शकते, हे लक्षात घेऊन, हा आता राजकीय प्रश्न झाला आहे. असंच आपल्याला दुर्दैवाने म्हणावं लागतंय. त्यामुळे लोकसभा निवडणूक जाहीर झाली असताना अशाप्रकारचं मराठा आरक्षणासंदर्भातलं अधिवेशन बोलवता येणार नाही, हे कायद्यानुसार स्पष्ट आहे." मराठा आरक्षणावरून राज्य सरकारसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अधिवेशनात मराठा आरक्षणासंदर्भात कोणताही ठोस निर्णय घेण्यात आला नाही.

### श्रद्धा आणि सबुरी ठेवावी

फेब्रुवारीमध्ये लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होईल, अशा काळात विशेष अधिवेशन बोलवता येणार नाही, असा अंदाज वर्तवला जात आहे. यावर एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. तसेच २४ तारखेचा अल्टीमेटम देणाऱ्या मनोज जरांगे यांनी श्रद्धा आणि सबुरी ठेवावी, अशी जाहीर विनंती मुख्यमंत्र्यांनी केली. ते हिवाळी अधिवेशनानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते. आचारसंहिता आणि मराठा आरक्षणाबाबत विचारलं असता मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, "हे सरकार शब्द देणारं आणि शब्द पाळणारं सरकार आहे. त्यामुळे कधी आचारसंहिता लागणार? हे आम्हाला माहीत आहे. गेल्या २० वर्षांपासून १ मार्चनंतरच आचारसंहिता लागते. त्यामुळे आचारसंहितेच्या नावाखाली हे काम आडवलं जाईल, असं काम आम्ही करणार नाही. त्यामुळे आम्ही जो शब्द दिला आहे, त्यावर आम्ही कायम आहोत."

# हिट अँड रनची शिक्षा कमी होणार!

## नवी फौजदारी विधेयके 'शिक्षे'ऐवजी 'न्याय' देणारी?

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केल्यानंतर ती एकमताने मंजूरही झाली. हे विधेयक मांडत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, आपण ब्रिटिशांच्या वसाहतवादाच्या शिक्षा यातून पुसून काढत आहोत. अमित शाह यावेळी म्हणाले की, भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार असे पहिले सरकार आहे, ज्यांनी निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने पूर्ण केली आहेत.**

आम्ही अनुच्छेद ३७० मागे घेतले, ईशान्य भारतातील अनेक राज्यातून अफ्स्पा (AFSPA) कायदा काढून टाकला, अयोध्येत राम मंदिर बांधले, तिहेरी तलाक रद्द केला आणि महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत भारतीय न्याय संहिता (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केली. ही तीनही विधेयके ब्रिटिश काळातील अनुक्रमे भारतीय दंड संहिता (१८६०), फौजदारी प्रक्रिया संहिता (१८८२) व भारतीय पुरावा कायदा (१८७२) या कायद्यांची जागा घेणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, ब्रिटिश राजवटीत १८६० साली पहिल्यांदा भारतीय दंड विधान संहिता आणली गेली होती. ही संहिता भारतीयांना शिक्षा देण्यासाठी आणली होती, त्यात न्यायाचे तत्त्व नव्हते. सर्व तीनही कायदे जवळपास १५० वर्ष जुने आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली पहिल्यांदा या नव्या संसद भवनाच्या इमारतीमध्ये आपण एक ऐतिहासिक पाऊल टाकत आहोत. भारतीय संविधानाने भारतातील नागरिकांना जे अधिकार दिले होते, ते अधिकार



ब्रिटिशकालीन फौजदारी प्रक्रियेमुळे मिळण्यात अडचणी येत होत्या. आता तीन नवे विधेयक सादर केल्यानंतर भारतीय नागरिकांना न्याय आणि तोही जलदगतीने मिळण्यास मदत होणार आहे. १. नवीन कलमे – फौजदारी प्रक्रिया संहितेऐवजी आणण्यात आलेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहितेत ४८४ ऐवजी ५३३ कलमे आहेत. नऊ कलमे वाढविण्यात आली, तर १७७ कलमांमध्ये बदल करण्यात आला. ३९ उपकलम समाविष्ट केल्या असून ४४ नव्या तरतुदी कायद्यात आहेत. २. बलात्कार, हत्या कलम बदलले – बलात्कारासाठी याआधी कलम ३७६ होते, यापूढे बलात्कारासाठी कलम ६६ आणि ६९ असणार आहे. तर हत्येसाठी कलम ३०२ च्या ऐवजी आता कलम १०१ असणार आहे. ३. बलात्कार प्रकरण – यापुढे बलात्कार प्रकरणात न्यायवैद्यक शाळेच्या अहवालाला प्रमुख स्थान असणार आहे.

नव्या तंत्रज्ञानाचा आधार घेऊन अशा संवेदनशील प्रकरणांचा तपास केला जाईल. ४. पीडिता किंवा पीडित यांना म्हणणे मांडण्याचा अधिकार – भारतीय न्याय संहितेने सुनावणीदरम्यान पीडित्याला आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार दिला आहे. तसेच शून्य एफआयआर पीडितेची किंवा पीडिताची बाजू ऐकून घेतल्याशिवाय मागे घेता येणार नाही. ५. राजद्रोहाचा कायदा रद्द – ब्रिटिश काळात आणला गेलेला राजद्रोहाचा कायदा रद्द करण्यात आला आहे. स्वातंत्र्यसैनिकांना तुरुंगात डाबण्यासाठी हे कलम ब्रिटिशांनी वापरले होते. त्याऐवजी आता देशद्रोहाचे कलम समाविष्ट केले आहे. ६. हिट अँड रन प्रकरण – हिट अँड रन प्रकरणात आता ज्याने धडक दिली, त्या वाहनचालकाने पीडित नागरिकाला रुग्णालयात वेळेवर दाखल केल्यास, त्याच्या शिक्षेत कपात करण्यात येणार आहे. पण जर धडक देऊन पळ काढला तर कठोर शिक्षा देण्यात येईल. ७. जामीन मिळणार – सुनावणी सुरू असतानाच आरोपीने जर एक तृतीयांश काळ तुरुंगात काढला असेल तर तो किंवा ती जामीन मिळण्यास पात्र ठरणार. ८. मॉब लिंचिंगसाठी फाशी – मॉब लिंचिंग हा गुन्ह्याचा नवा प्रकार असून या गुन्ह्यात आतापर्यंत अनेकांनी प्राण गमावले आहे. यापुढे मॉब लिंचिंग करण्यासाठी जबाबदार असलेल्यांना फाशींची शिक्षा देण्यात येणार आहे.

### अयोध्येत राम मंदिर बांधले

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केल्यानंतर ती एकमताने मंजूरही झाली. आम्ही अनुच्छेद ३७० मागे घेतले, ईशान्य भारतातील अनेक राज्यातून अफ्स्पा (AFSPA) कायदा काढून टाकला, अयोध्येत राम मंदिर बांधले, तिहेरी तलाक रद्द केला आणि महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत भारतीय न्याय संहिता (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (बीएस-२०२३) अशी तीन विधेयके सादर केली.

# मला भावना दुखवायच्या नव्हत्या

## नक्कल प्रकरणी बॅनर्जींचं स्पष्टीकरण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यसभेचे सभापती आणि देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची मिमिक्री केल्याप्रकरणी तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी बुधवारी स्पष्टीकरण दिलं. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, कोणाच्याही भावना दुखावण्याचा माझा हेतु नव्हता. धनखड मला खूप वरिष्ठ आहेत. त्यांनी हे प्रकरण इतकं वैयक्तिक का घेतलं हे माहीत नाही?**

मिमिक्री एक कला आहे. मिमिक्रीला कोणाच्याही अपमानाशी जोडू नये. पंतप्रधान



नरेंद्र मोदी यांनीही लोकसभेत मिमिक्री केली होती. मी याचे व्हिडीओही दाखवू शकतो. २०१४ ते २०१९ च्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी असं केलं होतं. माझं प्रकरण इतक्या गांभीर्याने का घेतलं गेलं?", असा प्रश्नही त्यांनी विचारला. वकिली क्षेत्रात धनखड मला वरिष्ठ आहेत. मी त्यांचा प्रचंड सन्मान करतो. मला कोणाच्या भावना दुखवायच्या नव्हत्या. पण त्यांनी हे प्रकरण इतक्या वैयक्तिक का घेतलं हे माहीत नाही. हे प्रकरण वैयक्तिक घेतलं आहे तर ते राज्यसभेत अशाप्रकारे का वागतात? असा माझा प्रश्न आहे," असंही धनखड म्हणाले. दरम्यान, तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी लोकसभेच्या पायऱ्यांवर बसून जगदीप धनखड यांची मिमिक्री केली होती. त्यांची ही मिमिक्री राहुल गांधी यांनी त्यांच्या मोबाईलमध्येही कैद केली. हा सर्व प्रकार व्हिडीओच्या माध्यमातून समोर आल्यानंतर काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसवर चौफेर टीका होऊ लागली. तसंच याप्रकरणी आता कल्याण बॅनर्जी यांच्याविरोधात गुन्हाही दाखल झाला आहे. डिफेंस कॉलनी पोलीस ठाण्यात अभिषेक गौतम या वकिलाने ही तक्रार केल. उपराष्ट्रपतींचा अपमान केल्याप्रकरणी तृणमूल काँग्रेसच्या खासदारावर गुन्हा दाखल करण्याची मागणी या तक्रारीत करण्यात आली. संसदेच्या बाहेर माध्यमांशी बोलताना खरगे म्हणाले की, सभापतींनी इतर सदस्यांना बोलताना संरक्षण देण्याची गरज असते. मात्र ते स्वतःच अशाप्रकारचे वक्तव्ये करत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा उपराष्ट्रपतींना फोन!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

गेल्या आठवड्याभरापासून दिल्लीतलं राजकीय वातावरण तापलं आहे. लोकसभेत दोन तरुणांनी घुसखोरी केल्याप्रकरणी विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. पंतप्रधान व गृहमंत्र्यांच्या निवेदनाची मागणी करणाऱ्या विरोधी पक्षाच्या १४१ खासदारांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या खासदारांनी मंगळवारी संसद भवनाच्या आवारात घोषणाबाजी केली. मात्र, त्यात तृणमूल काँग्रेसचे राज्यसभेतील खासदार कल्याण बॅनर्जी यांनी थेट उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची नक्कल केल्यामुळे सत्ताधाऱ्यांनी त्यावर तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी थेट धनखड यांना फोन करून खेद व्यक्त केला आहे. संसदेत आत्तापर्यंत कारवाई करून विरोधी पक्षाच्या १४१ खासदारांवर हिवाळी अधिवेशन संपेपर्यंत निलंबनाची कारवाई केली. याविरोधात काही खासदारांनी मंगळवारी संसदेच्या आवारात पायऱ्यांवर बसून घोषणाबाजी केली. काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जीही होते. यावेळी कल्याण बॅनर्जी यांनी राज्यसभेचे पदसिद्ध सभापती व देशाचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची विचित्र हावभाव करत नक्कल केली. त्याचवेळी काँग्रेस खासदार राहुल गांधी हा सगळा प्रकार मोबाईलमध्ये रेकॉर्ड करताना हसत असलेल्याचं व्हायरल व्हिडीओमध्ये दिसत आहे.

# शाहिद कपूरने खरेदी केली महागडी मर्सिडिज

बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूर (SHAHID KAPOOR) त्यांच्या सिनेमांमुळे चर्चेत असण्यासोबत लग्झरी लाईफस्टाइलमुळेदेखील चर्चेत असतो. गेल्या 20 वर्षांपासून शाहिद प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. शाहिदने आता नवी आलिशान कार विकत घेतली आहे. सोशल मीडियावर फोटो शेअर करत त्याने चाहत्यांसोबत आनंदाची बातमी शेअर केली आहे. शाहिद कपूरने मेहनतीच्या जोरावर स्वत:ला सिद्ध केलं आहे. आजच्या घडीला त्याच्याकडे अनेक महागड्या गाड्या आणि आलिशान घर आहे. आता त्याने नवी मर्सिडीज कार विकत घेतली आहे. सोशल मीडियावर त्याने नव्या कारसोबतचे फोटो शेअर केले आहेत. चाहत्यांनी कमेंट्स करत अभिनेत्याला शुभेच्छा दिल्या आहेत. शाहिद कपूरने नवी मर्सिडीज घेतली आहे. क्याने मर्सिडीज MAYBACH ही कार घेतली आहे. या गाडीची किंमत कोट्यवधी रुपयांच्या आसपास आहे. याआधी 2023 मध्ये शाहिदने मर्सिडीज MAYBACH S580 ही गाडी विकत घेतली होती. या गाडीची किंमत 2.8 कोटींच्या आसपास आहे. आता त्याच्या ताफ्यात आणखी एका गाडीचा समावेश झाला आहे. शाहिदआधी अनेक बॉलिवूडकरांनी मर्सिडीज विकत घेतली आहे. अनिल कपूर यांनी दिवळीच्या मुहूर्तावर गाडी विकत घेतली होती. त्यांनी मर्सिडिज मेबैक एस-क्लास ही गाडी घेतली आहे. या गाडीची किंमत 2.69 ते 3.40 कोटींच्या आसपास आहे. तापसी पन्नूने गणेश चतुर्थीच्या आसपास मर्सिडीज मेबैक GLS 600 लग्झरी कार खरेदी केली आहे. श्रद्धा कपूरने दसऱ्याच्या मुहूर्तावर लाल रंगाची लॅम्बॉर्गिनी ह्यूराकन टेक्निका ही कार विकत घेतली आहे.

# कतरिना आणि विजय सेतूपतीचा 'लिपलॉक

अभिनेत्री कतरिना कैफ (KATRINA KAIF) आणि अभिनेता विजय सेतूपती (VIJAY SETHUPATHI) यांच्या मेरी ख्रिसमस (MERRY CHRISTMAS) या चित्रपटाची उत्सुकतेने वाट बघत आहेत. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच रिलीज झाला आहे. या ट्रेलरमधील कतरिना आणि विजयच्या केमिस्ट्रीनं लक्ष वेधले आहे. श्रीराम राघवन दिग्दर्शित मेरी ख्रिसमस या चित्रपटाच्या ट्रेलरच्या सुरुवातीला कतरिना आणि विजय सेतुपती यांची भेट दाखवण्यात आली आहे. मग कतरिना आणि विजयचा एकमेकांसोबत फ्लर्ट करतात. पुढे ट्रेलरमधील कतरिना विजयला तिच्यासोबत ख्रिसमस साजरा करण्याची ऑफर देते आणि नंतर हळूहळू कथा थ्रिलर होताना दिसते. चित्रपटातील कतरिना कैफ आणि विजयच सेतुपती यांचा लिपलॉक किसिंग सीन देखील ट्रेलरमध्ये दिसत आहे. या सीननं अनेकांचे लक्ष वेधले आहे. मेरी ख्रिसमस हा चित्रपट हिंदी आणि तमिळ व्हर्जनमध्ये रिलीज होणार आहे. विजय सेतुपती आणि कतरिना कैफ यांच्याशिवाय या चित्रपटात संजय कपूर, विनय पाठक, प्रतिमा कन्नन आणि टिनू आनंद हे कलाकार काम करणार आहेत. तसेच राधिका सरथकुमार, षणमुगराजा, काविन जय बाबू आणि राजेश विल्यम्स हे कलाकार देखील या चित्रपटात महत्वाची भूमिका साकारणार आहे. राधिका आपटे आणि अश्विनी काळसेकर या चित्रपटात कॅमिओ भूमिका करताना दिसणार आहेत. हा चित्रपट 12 जानेवारी 2024 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# लोकशाही बसली धाब्यावर !

मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातले शेवटचे हिवाळी अधिवेशन (WINTER SESSION 2023) सध्या सुरु आहे. आज या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. हे अधिवेशन चांगलंच गाजताना दिसतंय. कारण सुरक्षा व्यवस्थेमध्ये झालेल्या त्रुटीवर केंद्रीय गृहमंत्री किंवा पंतप्रधानांनी निवेदन करावं अशी मागणी करणाऱ्या विरोधी पक्षांच्या 141 खासदारांना निलंबित (PARLIAMENT MP SUSPENDED) करण्यात आलं. अशातच आता खासदार निलंबन प्रकरणाबाबत अभिनेत्री तेजस्विनी पंडितनं (TEJASWINI PANDIT) एक ट्वीट शेअर केलं आहे. तिच्या या ट्वीटनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. तेजस्विनी पंडितनं ट्वीटमध्ये लिहिलं, "चला बिलं पास करुन घ्या पटापट, मेजॉरिटी तर आधीपासून होतीच आता तर विरोध करायला कुणी नाही....! लोकशाही बसली धाब्यावर !!! हुकूमशाहीचा उदय की अंताकडे प्रवास??" तेजस्विनीनं या ट्वीटला नो डेमोक्रसी आणि अधिवेशन हे दोन हॅशटॅग्स देखील दिले आहेत. तेजस्विनीच्या ट्वीटवर कमेंट करुन काही नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं तर काहींनी तिचं कौतुक केलं आहे. एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "तेजस्विनी तुमच्या सारखे स्पष्ट बोलणारे निडर लोकं खुप कमीच राहीले आहेत आत्ता या देशात" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "तेजस्विनी, खरंच तुमच्याबद्दल आदर वाढला. जे चोखपणे तुम्ही तुमचं म्हणणं न घाबरता मांडल त्याबद्दल खूप खूप धन्यवाद.



# श्रेयस तळपदेला रुग्णालयातून डिस्चार्ज



अभिनेता श्रेयस तळपदेला (SHREYAS TALPADE) काही दिवसांपूर्वी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर श्रेयसला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयात त्याच्यावर उपचार सुरु होते. आता श्रेयसला डिस्चार्ज मिळाला आहे. श्रेयसची पत्नी दीप्ती तळपदेनं नुकतीच एक पोस्ट शेअर करुन श्रेयसच्या हेल्थची माहिती दिली आहे. दीप्तीनं सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिलं आहे, "अविश्वसनीय सपोर्टसाठी मनापासून कृतज्ञता व्यक्त करत आहे. तुमचे संदेश माझ्यासाठी आधारस्तंभ आहेत. मी कदाचित वैयक्तिकरित्या प्रत्येकाला वैयक्तिक रित्या मेसेज करु शकत नसेल, परंतु प्रत्येकाचे मनापासून धन्यवाद" पुढे दीप्तीनं पोस्टमध्ये लिहिलं, "माझे जीवन, श्रेयस, घरी परतले आहे. तो आता सेफ हे. मी विश्वास कुठे ठेवावा हे मला कळत नाहीये, असं म्हणत मी श्रेयसशी वाद घालत होते. आज मला माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालं आहे आहे, याचं उत्तर सर्वशक्तिमान देव असं आहे. आमच्या आयुष्यात ही भयानक घटना घडली त्या संध्याकाळी तो माझ्यासोबत होता. यापुढे अस्तित्वावर कधी प्रश्नचिन्ह निर्माण होईल असे मला वाटत नाही. मी आमच्या शहरातील चांगल्या लोकांचे आभार मानू इच्छिते. त्या संध्याकाळी मी मदतीसाठी हाक मारली आणि मला त्यापैकी 10 जणांनी मदत केली. श्रेयस गाडीच्या आत पडून होता, त्या लोकांना माहित नव्हते की, ते कोणाला मदत करत आहेत. तरीही ते धावत आले. आमच्यासाठी ते लोक त्या संध्याकाळी देव अवतार होऊन आले. धन्यवाद. मला आशा आहे की, माझा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचेल. मी तुमची सदैव ऋणी राहीन. हेच मुंबई शहराचं स्पिरिट आहे. " "मी मित्र, कुटुंब आणि मराठी आणि हिंदी फिल्म इंडस्ट्रीचे आभार मानते. त्यापैकी काही जण ते करत असलेले सर्व कामे सोडून माझ्यासोबत उभे होते. तुम्हा सर्वांमुळे मी एकटी नव्हते. माझ्याकडे धीर देण्यासाठी खांदे आणि मजबूत राहण्यासाठी आधार देणारी लोकं होती", असंही दीप्तीनं पोस्टमध्ये लिहिलं. दीप्तीनं या पोस्टमधून श्रेयसवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे देखील आभार मानले आहे. तसेच या पोस्टमधून

# मलायकाच्या ड्रेसिंग सेन्समुळे घटस्फोट!



बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता अरबाज खान (ARBAAZ KHAN) आणि अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) यांची ओळख एकेकाळी 'बॉलिवूडचे पॉवर कपल' अशी होती. पण 2017 मध्ये दोघांनीही एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. मलायकाच्या ड्रेसिंग सेन्समुळे दोघांचा घटस्फोट झाला अशी चर्चा त्यावेळी सुरु होती. पण याबाबत स्वत: अरबाजनं एका मुलाखतीमध्ये सांगितलं होतं. मलायका आणि अरबाज यांची भेट 90 च्या दशकात एका फोटोशूटदरम्यान झाली होती. यानंतर दोघांची मैत्री झाली आणि मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. 1998 मध्ये अरबाज आणि मलायका यांनी मोठ्या थाटामाटात लग्न केले. 2002 मध्ये मलायका आणि अरबाज हे आई-बाबा झाले. त्यांनी त्यांच्या मुलाचे नाव अरहान असं ठेवलं. जवळपास 19 वर्षांच्या संसारानंतर दोघांनी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. मलायका अरोरा हिने एका मुलाखतीत असे सांगितले होते की, तिला पुढील जन्मातही खान कुटुंबाची सून व्हायचे आहे. पण नंतर अरबाज आणि मलायका यांच्या नात्यात दुरावा निर्माण झाला आहे, अशा अनेक बातम्या समोर आल्या. मलायका आणि अरबाज यांच्या घटस्फोटामागे नेमके कारण काय आहे? हे त्यांच्या चाहत्यांना जाणून घ्यायचे होते. तसंच मलायकाची ड्रेसिंग स्टाईल किंवा फॅशनमुळे दोघांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याचा अंदाज चाहत्यांनी व्यक्त केला होता.याबाबत अरबाजला देखील एका मुलाखतीमध्ये प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यानं उत्तर दिलं, "मलाइकाच्या कपड्यांवर मी कधीही कोणतेही बंधन घातलेले नाही. मलायकाच्या कपड्यांचे मी नेहमीच समर्थन करत आलो आहे. कारण मला माहीत आहे की एखाद्याला एखादी गोष्ट करण्यापासून रोखले तर तो तेच काम सतत करतो. त्यामुळे मलायकाच्या फॅशन स्टाइलबद्दल मी कधीच काही बोललो नाही."मलायका आणि अरबाज यांचे नाते तुटण्याचे कारण आजूनही त्यांनी स्पष्टपणे सांगितलेले नाही. पण दोघांमध्ये मतभिन्नता होती. यानंतर दोघेही वेगळे झाले.

# रोहित शर्मा चेन्नईकडून खेळणार?

## » रोहित मुंबई सोडू शकतो सोशल मीडियात चर्चा सुरू

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**मुंबई इंडियन्सने रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केल्यानंतर, सोशल मीडियावर फ्रँचायझींवर टीका होत आहे. संघाच्या या निर्णयावर चाहते सोशल मीडियावर सतत प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यामुळे रोहित शर्मा संघ सोडू शकतो, असे बोलले जात आहे. एक किंवा दोन फ्रँचायझींनी व्यापारासाठी त्याच्या उपलब्धतेबद्दल चौकशी केल्याचे वृत्त देखील होते. रोहित व्यतिरिक्त सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह यांच्याबद्दल असेही बोलले जात आहे की ते दोघेही दुसऱ्या संघात सामील होऊ शकतात. मात्र, याला मुंबई इंडियन्सने कुठलाही अधिकृत दुजोरा दिलेला नाही.**





मुंबई इंडियन्सचे अनेक खेळाडू चेन्नई सुपर किंग्जमध्ये जाऊ शकतात, असेही सोशल मीडियावर बोलले जात होते. या संदर्भात, चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ काशी विश्वनाथन यांनी त्यांची फ्रँचायझी मुंबईबरोबरच्या कोणत्याही संभाव्य व्यापारापासून दूर आहे. एका मुलाखतीत विश्वनाथन म्हणाले की, "कोणत्याही खेळाडूची खरेदी-विक्री सीएसकेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. सध्या असा एकही खेळाडू नाही की ज्याची फ्रेंचायझी मुंबईशी व्यापार करू शकेल. त्यामुळे या चर्चा निरर्थक आहेत. तत्त्वानुसार, आम्ही खेळाडूंचा व्यापार करत नाही आणि आमच्याकडे मुंबई इंडियन्सबरोबर व्यापार करण्यासाठी खेळाडू नाहीत. आम्ही त्यांच्याशी संपर्क साधला नाही आणि आमचा तसा कुठलाही हेतू नाही. आम्ही त्यांना कुठल्याही प्रकारचा संपर्क केलेला नाही." काशी विश्वनाथन दुबईतील लिलावादरम्यान यांनी, रोहित शर्माच्या सीएसकेमध्ये येणाच्या चर्चांना तूर्तास तरी पूर्णविराम दिला. लिलावादरम्यान, मुंबई इंडियन्सचे जागतिक क्रिकेट प्रमुख महेला जयवर्धने याला रोहितकडून कर्णधारपदाची जबाबदारी काढून घेण्याच्या निर्णयाबद्दल विचारण्यात आले. तो म्हणाला की, "कधी कधी असे कठीण निर्णय घ्यावा लागतो. आता हिटमॅनने त्याचा उत्तराधिकारी हार्दिकला मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. शेवटी संघ हा सर्वतोपरी असतो." जयवर्धने पुढे म्हणाला, "पुढील पिढीला मैदानावर आणि मैदानाबाहेर मार्गदर्शन करण्यासाठी रोहित शर्मा संघात असणे आमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. रोहितबरोबर मी खूप जवळून काम केले आहे. तो एक विलक्षण माणूस आहे आणि मला खात्री आहे की तो या वारशाचा एक भाग असेल. तरुणांबरोबर खेळणाऱ्या सचिन तेंडुलकरबरोबरही मुंबईने असेच काहीसे केले होते. त्याने नेतृत्व दुस-याकडे दिले आणि मुंबई इंडियन्स योग्य मार्गावर जात असल्याची खात्री करून घेतली. तीच गोष्ट आता आम्ही करत आहोत. आम्ही याबाबत फ्रँचायझींबरोबर दीर्घ चर्चा केली आणि त्यानंतरच हा निर्णय घेतला." लिलावादरम्यान, मुंबई इंडियन्सचे जागतिक क्रिकेट प्रमुख महेला जयवर्धने याला रोहितकडून कर्णधारपदाची जबाबदारी काढून घेण्याच्या निर्णयाबद्दल विचारण्यात आले. तो म्हणाला की, "कधी कधी असे कठीण निर्णय घ्यावा लागतो. आता हिटमॅनने त्याचा उत्तराधिकारी हार्दिकला मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. शेवटी संघ हा सर्वतोपरी असतो." जयवर्धने पुढे म्हणाला, "पुढील पिढीला मैदानावर आणि मैदानाबाहेर मार्गदर्शन करण्यासाठी रोहित शर्मा संघात असणे आमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. रोहितबरोबर मी खूप जवळून काम केले आहे.मुंबई इंडियन्सचे अनेक खेळाडू चेन्नई सुपर किंग्जमध्ये जाऊ शकतात, असेही सोशल मीडियावर बोलले जात होते. या संदर्भात, चेन्नई सुपर किंग्सचे सीईओ काशी विश्वनाथन यांनी त्यांची फ्रँचायझी मुंबईबरोबरच्या कोणत्याही संभाव्य व्यापारापासून दूर आहे. एका मुलाखतीत विश्वनाथन म्हणाले की,"कोणत्याही खेळाडूची खरेदी-विक्री सीएसकेच्या तत्त्वांच्या विरोधात आहे. मुंबई इंडियन्सने रोहित शर्माच्या जागी हार्दिक पांड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केल्यानंतर, सोशल मीडियावर फ्रँचायझींवर टीका होत आहे. संघाच्या या निर्णयावर चाहते सोशल मीडियावर सतत प्रश्न उपस्थित करत आहेत. त्यामुळे रोहित शर्मा संघ सोडू शकतो, असे बोलले जात आहे.

### शेवटी संघ हा सर्वतोपरी असतो

» एक किंवा दोन फ्रँचायझींनी व्यापारासाठी त्याच्या उपलब्धतेबद्दल चौकशी केल्याचे वृत्त देखील होते. रोहित व्यतिरिक्त सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह यांच्याबद्दल असेही बोलले जात आहे की ते दोघेही दुसऱ्या संघात सामील होऊ शकतात. मात्र, याला मुंबई इंडियन्सने कुठलाही अधिकृत दुजोरा दिलेला नाही. लिलावादरम्यान, मुंबई इंडियन्सचे जागतिक क्रिकेट प्रमुख महेला जयवर्धने याला रोहितकडून कर्णधारपदाची जबाबदारी काढून घेण्याच्या निर्णयाबद्दल विचारण्यात आले. तो म्हणाला की, "कधी कधी असे कठीण निर्णय घ्यावा लागतो. आता हिटमॅनने त्याचा उत्तराधिकारी हार्दिकला मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. शेवटी संघ हा सर्वतोपरी असतो." जयवर्धने पुढे म्हणाला, "पुढील पिढीला मैदानावर आणि मैदानाबाहेर मार्गदर्शन करण्यासाठी रोहित शर्मा संघात असणे आमच्यासाठी खूप महत्त्वाचे आहे.

# मजबूत फलंदाजीपेक्षा मजबूत गोलंदाजी महत्त्वाची

## » आमच्या गोलंदाजांनाही खूप मदत करेल : गौतम गंभीर

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयपीएल २०२४ चा लिलाव १९ डिसेंबर रोजी दुबईत पार पडला. या लिलावात कोलकाता नाईट रायडर्स संघाने आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू केला. केकेआरने ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कवर पैशांचा पाऊस पाडत त्याला २४.७५ कोटी रुपयांना खरेदी केले.**






यानंतर केकेआर संघाचा मेंटॉर गौतम गंभीरने मिचेल स्टार्कसाठी विक्रमी बोली लावण्याच्या त्याच्या फ्रँचायझीच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. तो म्हणाला, मिचेल स्टार्क 'एक्स फॅक्टर' असून गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करेल. केकेआर फ्रँचायझीचा मेंटॉर गंभीर देखील लिलावात उपस्थित होता, तो जिओ सिनेमाशी संवाद साधताना म्हणाला, "स्टार्क हा एक 'एक्स फॅक्टर' आहे, यात काही शंका नाही. तो नवीन चेंडूने गोलंदाजी करू शकतो, तो डेथ ओव्हर्समध्ये गोलंदाजी करू शकतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्वही करू शकतो. तो आमच्या दोन देशांतर्गत गोलंदाजांनाही खूप मदत करेल. कारण आमचे दोन्ही गोलंदाज खूप प्रतिभावान आहेत. त्यांना मैदानावर मदत करण्यासाठी कोणीतरी हवे आहे आणि या सर्व भूमिकांमध्ये स्टार्क यशस्वी होईल. गौतम गंभीर पुढे म्हणाला, "तो केवळ त्याच्या गोलंदाजीसाठीच नाही तर गोलंदाजी आक्रमणाचे नेतृत्व करण्यासाठी देखील महत्त्वाचा असेल. ज्यामुळे इतर सर्व गोलंदाजांना मदत होईल. त्यामुळे कोणाला तरी ही किंमत मोजावी लागेल." गौतम गंभीरने आपल्या आपल्या नेतृत्वाखाली केकेआरला दोन आयपीएल विजेतेपद मिळवून दिले आहे. तो म्हणाला की त्याच्या मते मजबूत फलंदाजीपेक्षा मजबूत गोलंदाजी लाइन-अप महत्त्वाची आहे. भारताचा माजी सलामीवीर म्हणाला, "आमच्या गोलंदाजीत खूप खोली आहे. आम्हाला नेहमीच एक मजबूत गोलंदाजी आक्रमण हवे होते आणि आता आमच्याकडे मुजीब उर रहमान, गुस ऍटकिन्सन, सुनील नरेन, वरुण चक्रवर्ती आणि मिचेल स्टार्कसह बरेच पर्याय आहेत.

### केकेआर हा संघ नसून एक भावना

» गौतम गंभीरला २०१२ आणि २०१४ मध्ये जेतेपद मिळवून देणाऱ्या फ्रँचायझीमध्ये परत येण्याबद्दल विचारण्यात आले, तेव्हा तो म्हणाला, "माझ्यासाठी केकेआर हा संघ नसून एक भावना आहे. यामागचे कारण म्हणजे मला कोलकात्यातील लोकांकडून सात वर्षांपासून अपार प्रेम मिळाले आहे.